# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०८/०३/२०१९ रोजी (का.प.क्र.२६) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक ०८/०३/२०१९ रोजी (का.प.क्र.२६) मा.सभापती श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी ११:३० वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.उपआयुक्त (श्री.डी.पी.कुलकर्णी), नगर सचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०२. स.स.श्री.ऋषीकेश चंद्रकांत खैरे
०३. स.स.श्री.सिध्दांत संजय शिरसाट
०४. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
०५. स.स.श्रीमती शेख नरगीस सलीम
०६. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे
०७. स.स.श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे
०८. स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल
०९. स.स.श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
१०. स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान
११. स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर

(यावेळी जागतिक महिला दिनानिमित्त श्री.गजानन बारवाल, श्रीमती.शिल्पाराणी वाडकर, सत्यभामा शिंदे, स्वाती नागरे, जयश्री कुलकर्णी, राखी देसरडा यांनी सर्व महिलांना शुभेच्छा दिल्या.)

मा.सभापती : सभागृहातर्फे महिला दिनाच्या सर्व महिलांना शुभेच्छा देण्यात येते.

श्री.गजानन बारवाल : मागच्या बैठकीपासुन ऑडिटचा विषय राहिलेला होता. जो अहवाल आलेला आहे त्याबाबत मुख्यलेखापरिक्षक यांनी माहिती द्यावी.

मा.सभापती : माहिती देण्यात यावी.

मुख्यलेखापरिक्षक : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०६, ३ अन्वये वार्षीक लेखा परिक्षण वर सादर केलेला आहे. अहवालाच्याबाबतीत वेळो वेळी जे लेखा परिक्षण केलेले आहे त्या त्या सर्व अहवालाचा संकलित केलेला वार्षिक अहवाल सादर केलेला आहे. यात प्रत्येक विभागाचे अहवाल आहे. मा.महापौर, मा.सभापती, मा.आयुक्त यांनी वेळो वेळी दिलेल्या चौकशी अहवालाचा देखील यामध्ये समावेश आहे. चौकशी अहवाल आणि लेखा परिक्षण अहवाल वेळीस सादर केले आहे. आयुक्तांनी याची वेळो वेळी दखल घेऊन संबंधीत एचओडीना विचारना देखील केलेली आहे. (यातील काही प्रमुख मुद्दे बाबत मुख्यलेखा परीक्षक यांनी सभागहात माहिती दिली.)

श्री.गजानन बारवाल : मुख्यलेखा परिक्षक मॅडम यांनी अहवाल सादर केला आणि तो स्पष्ट सुध्दा केला आहे. त्यांनी सविस्तर मत व्यक्त केले आहे. या अहवालाची गंभीर दखल प्रशासनाने घेणे गरजेचे होते. मा.आयुक्तांनी हजर रहाणे गरजेचे होते. मुख्यलेखा परिक्षक विभागाने सर्व विषयामध्ये माहिती करुन घेतलेली आहे. जो अहवाल आला आहे याची दखल प्रशासनाने योग्य रितीने घ्यावी. आणि यावर अमलबजावणी करावी. हे दोन्ही विभाग महापौर आणि सभापतीच्या अधिन आहे याची त्यांनी दखल घ्यावी.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : अहवाल तयार करतांना नगर रचना विभागाच्या काही संचिकेची तपासणी करुनच हा अहवाल तयार केलेला आहे. बरीच माहिती त्यांना देण्यात आलेली नाही. माहिती पुरवण्यात आली असती तर किती कोटीचे नुकसान महापालिकेला झालेले आहे ते दिसुन आले असते. यात जे कोणी जबाबदार असतील त्यावर गंभीर दखल घेण्यात यावी.

श्रीमती.राखी देसरडा : मागील बैठकीतील विषय क्र.२६४ मुख्य लेखा परिक्षण अहवाल सन १६-१७, १७-१८ विचार विनिमय करणे. समाजामध्ये काही प्रमाणात महिला ह्या दैनंदीन जीवणामध्ये खर्च करीत असतात पण त्या परिवाराचे लेखा परिक्षण हे पुरुष वर्ग मोठ्या प्रमाणावर करतात. औरंगाबाद मनपाचे मुख्य लेखा परिक्षण अहवाल ह्या एक महिला श्रीमती.दि.मा.देवतराज मॅडम करित आहे. तसेच महानगरपालिकेमध्ये मुख्य लेखा परिक्षण पद असेल, आरोग्य अधिकारी, उपायुक्त, वार्ड अधिकारी मुख्यध्यापक पदी अशा विविध पदावर महिला प्रतिनिधी मोठ्या कार्य क्षमतेने हे पद अत्यंत चांगल्या पध्दतीने भूषवीत आहे. अहवालामध्ये चर्चा करित असतांना विषेश चौकशी अहवालात १२ विविध कामाची चौकशी प्रशासनाने आदेशित केले होते त्या कामामध्ये बऱ्याच बार्बीची अनियमीतता आढळुन येत आहे. असे स्पष्ट नमुद केलेले दिसून येत आहे. सदरील चौकशी सन २०१६ ते २०१८ या मधील आहे. लेखा परिक्षण अहवाल तयार होऊन काही चौकशांना तीन वर्ष होत आहे. परंतु एकही प्रकरणात प्रशासनाने प्रशासन स्तरावर अंतिम कठोर निर्णय घेतलेला दिसुन येत नाही. सदरील अहवालातील काही मुद्दे मी आपणास वाचून दाखवीत आहे.

वार्ड क्र.४८ अविष्कार कॉलनी येथील व्यायाम साहित्य पुरवठा अनियमितता चौकशी अहवाल, यामध्ये आठ मुद्दे आहेत त्यातील काही मुद्दे वाचुन दाखवते.

१. दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतुदींचे पालन करण्यात आलेले नाही.
२. रु.३.५० लक्ष साहित्य खरेदी विनावापर पडुन असतांना पुनश्च रु.६.५० लक्षचे व्यायाम शाळा साहित्य खरेदीची प्रक्रिया का करण्यात आली याचा बोध होत नाही.
३. रु.६.५० लक्ष साहित्य खरेदीच्या निविदेत लिफाफा क्र.१ मधील कागदपत्रे, न तपासता सर्व कागदपत्रे, धनाकर्ष इ.प्राप्त झाल्याचे दर्शवून क्रिडा विभागाने लिफाफा क्र.२ उघडला व त्यात नमुद निविदा दर मंजुरीसाठी प्रस्तावित केले. त्यास मा.आयुक्त यांची मान्यता घेतली. यास सर्वस्वी क्रिडा विभागच जबाबदार आहे.
४. लिफाफा क्र.१ मधील कागदपत्रात व्यायामशाळा साहित्य पुरविण्यास नोंदणीकृत पुरवठाधारक असल्याबाबतचे वैध प्रमाणपत्र सादर केलेले नाही. सादर केलेल्या प्रमाणपत्राची मुदत दिनांक १५.१०.२०१३ रोजी संपुष्टात आली आहे. तसेच निविदाधारक हा अधिकृत पुरवठाधारक असल्याचे सिध्द होत नाही. असे असतांना रु.६.५० लक्षचे साहित्य खरेदी निविदा अंतीम करुन पुरवठा आदेश निर्गमित करणे अयोग्य आहे.

खाजगी एजन्सी मार्फत सुरक्षा रक्षक पुरविण्याचे काम व संबंधीतांना अदा केलेली रक्कमेच्या बाबत चौकशीचा अहवाल, यामध्ये ही पंधरा मुद्दे आहेत. त्यापैकी काही मुद्दे वाचुन दाखवते.

१. २ जानेवारी १९९२ व १५ ऑक्टोबर २०१५ च्या शासन निर्णयातील तरतुदीचे निविदा प्रक्रिया करतांना पालन झालेले नाही.
२. सुरक्षा रक्षकांच्या उपस्थितीबाबतचे हजेरीपत्रकावर ज्या ठिकाणी सुरक्षा रक्षक कार्यरत आहेत तेथील सक्षम अधिकाऱ्यांनी हजेरी प्रमाणित करणे आवश्यक आहे. तसे न होता सुरक्षा अधिकाऱ्यांनी सर्व खाजगी सुरक्षा रक्षकांच्या हजेऱ्या प्रमाणित केलेल्या आहेत. सुरक्षा अधिकाऱ्यांना असे अधिकार कार्यालयाने प्रदान केलेले निदर्शनास आलेले नाही.
३. लेखा विभागाकडुन प्रदान देयकांची रक्कम रु.७,२१,३०,९६७/- एवढी होत आहे. लेखापरीक्षण विभागाकडे प्राप्त संचिकेतील प्रदान देयकांची र.रु.३,२७,१६,६८५/- आहे. दोन्हीतील फरकाची रक्कम रु.३,९४,१४,२८२/- एवढी येत असुन उक्त रकमेच्या देयकांची पडताळणी कामगार विभागाकडुन संचिका प्राप्त न झाल्यामुळे तपासणी करता आली नाही. दोन्ही विभागाने समन्वय साधून याबाबत मा.आयुक्तांकडे खुलासा सादर करणे आवश्यक वाटते.

सदरील अहवालामध्ये कामगार विभागाने मा.आयुक्तांकडे वरिल बाबीचा खुलासा सादर करणे आवश्यक वाटते असे स्पष्ट अभिप्राय मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी कळवले असतांना सुध्दा आज जवळपास दोन वर्षाचा कार्यकाळ निघुन गेलेला आहे. सदरील विभागाने

मा.आयुक्त यांना खुलासा सादर केला का नाही आज रोजी पर्यंत स्थायी समिती सदस्यांना माहित नाही. व कळवले असल्यास सदरील खुलासा आम्हास प्राप्त झालेला नाही. याचा अर्थ असा की, प्रशासन मुख्य लेखा परिक्षकाने केलेले अहवालावर सिरीयस नाही. सदरील अहवालामध्ये ऐवढया मोठ्या प्रमाणात अनियमीतता झालेली आहे हे स्पष्ट दिसून येत असुन सुध्दा प्रशासनाने अंतीम कठोर निर्णय घेतलेले दिसुन येत नाही. मनपा स्थापन झाल्यापासुन मुख्य लेखा परिक्षक सदरील अहवाल स्थायी समितीस ज्या वेळेस अदा करतो त्याच वेळेस अहवालाची एक प्रत मा.आयुक्त यांना देण्यात येते. व त्या नंतर स्थायी समिती या अहवालावर चर्चा करुन सदरील अहवालावर प्रशासनाने योग्य ती कारवाई करावी. असे स्थायी समिती प्रशासनाला आदेश देत असते. गेल्या २५ ते ३० वर्षा पासुन लेखा परिक्षण अहवालामध्ये ऐवढ्या स्पष्ट पणे अनियमीतता दाखवल्यावर सुध्दा अंतिम कठोर निर्णय झालेले माझ्या निदर्शनास आलेले नाही. नागरीक आपल्या कष्टाचा व घामाचा पैसा मालमत्ता कराच्या माध्यमातुन व विविध कराच्या माध्यमातुन मनपास अदा करीत असते व त्या पैश्यातुन करोडो रुपयाची उधळपट्टी प्रशासन करीत असते. असे केल्यानंतर त्या दोषीवर अंतीम कठोर शिक्षा होत नसेल तर हे मुख्य लेखा परिक्षण अहवाल तपासणी करुन व आपण स्थायी समितीत चर्चा करुन काही उपयोग नाही. आज रोजी पर्यंत मनपाने जेवढे मुख्य लेखा परिक्षण अहवाल स्थायी समितीस दिले व त्यावर स्थायी समिती सदस्यांनी चर्चा करुन प्रशासनाने काय कारवाई केली याचा संपुर्ण अहवाल एका महिन्याच्या आत सर्व सदस्यांना द्यावा. असे आदेशित प्रशासनाला करण्यात यावे अन्यता मा.उच्च न्यायालयात प्रशासनाच्या विरुध्द दाद मागावी लागेल.

श्रीमती.स्वाती नागरे : प्रशासनाने या अहवालावर दखल घ्यावी. यामध्ये भरपुर त्रुटी आहेत.

मा.सभापती : प्रथम मुख्यलेखा परिक्षक मॅडमचे खुप-खुप अभिनंदन कारण की, त्यांनी अतिशय कमी मॅनपावर मध्ये, कमी सोयीमध्ये हा अहवाल स्थायी समितीसमोर ठेवला आहे. या अहवालामध्ये ज्या ज्या गोष्टींचा उल्लेख केला, ऑडिट सादर केला आहे त्याचा स्थायी समिती स्वीकार करते. त्यांनी दिलेल्या अहवालावर स्थायी समिती अतिशय गंभीर आहे. परंतु प्रशासन गंभीर असल्याचे दिसत नाही. प्रत्येक वेळी स.सदस्यांनी महापालिकेतील विविध विभागामधील काय काय गोंधळ होतो ते प्रशासनास निदर्शनास आणुन दिलेले आहे. असे असुन सुध्दा दोन-तीन वर्ष एका-एका विषयाची चौकशी होऊन सुध्दा कुठलीही कारवाई प्रशासनाकडुन होतांना दिसत नाही. ज्या विभागाने ऑडिट विभगाला संचिका दिल्यामध्ये, लेखी पुरवण्यामध्ये मदत केली नाही किंवा सहकार्य केले नाही अशा सर्व व्यक्तींवर प्रशासनाने तातडीने कारवाई करावी. अनेक गोष्टींमध्ये अक्षेप नोंदविला आहे. खुलासा करण्यासाठी मा.आयुक्तांच्या मार्फत पंधरा दिवसामध्ये प्रत्येक संबंधीत विभागाने करावे. हे करत असतांना काही अक्षेप डिलिट केले जातील, जे उर्वरित अक्षेप असतील या संदर्भात मा.आयुक्तांनी स्वतः त्यांच्या दालनामध्ये ऑडिटर, संबंधीत विभागाचे म्हणणे, खुलाशासह चर्चा करुन खुलासा समाधानकारक झाला तर त्याच्यावर कुठलीही कारवाई करण्यात येऊ नये. परंतु जर कोणी दोषी आढळत असेल तर कुठल्याही परिस्थितीत अतिशय गार्भियाने कारवाई करावी. अशी स्पष्ट सुचना समितीच्या मार्फत देण्यात येते.

(यावेळी सभागृहात स्थायी समितीचे स.सदस्य श्री.गजानन बारवाल, श्री.सिध्दांत शिरसाट, श्री.ऋषिकेश खैरे, श्रीमती.राखी देसरडा, जयश्री कुलकर्णी, स्वाती नागरे, सायरा बानो, शिल्पाराणी वाडकर, सत्यभामा शिंदे यांनी तसेच प्रशासनातर्फे विधी सल्लागार यांनी मा.सभापती श्री.रेणुकादास वैद्य यांनी त्यांचे कार्यकाळात केलेल्या कार्याबाबत व सभागृहात घेतलेले निर्णय याबाबत गौरव केला. व शब्दसुमननाने अभिनंदन केले.)

**<u>विषय क्र. २७० :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, घनकचरा व्यवस्थापन विभाग व वॉर्ड कार्यालयात कार्यरत ४ स्थायी स्वच्छता निरीक्षक व १२ प्रभारी स्वच्छता निरीक्षक यांचेकडे प्रत्येकी ३ ते ४ वॉर्डाचे कार्यक्षेत्र असून त्यांच्या

वाहनांना दररोज १.५ लिटर पेट्रोल लागते. सद्यस्थितीत त्यांना जा.क्र.मनपा/आस्था-१/२०१६/५१६ दि.३०/०३/२०१६ अन्वये दरमाह रू.१५००/- वाहनभत्ता देण्यात येतो, त्यांचे नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| ०१. | पी.बी.चव्हाण | स्वच्छता निरीक्षक |
| ०२. | बि.जे.पाटील | स्वच्छता निरीक्षक |
| ०३. | असदउल्ला खान | स्वच्छता निरीक्षक |
| ०४. | रविकिरण कुलकर्णी | स्वच्छता निरीक्षक |
| ०५. | सचिन भास्कर भालेराव | प्रभारी स्वच्छता निरीक्षक |
| ०६. | विशाल मोतीराम खरात | प्रभारी स्वच्छता निरीक्षक |
| ०७. | बंडु शेषराव साबळे | प्रभारी स्वच्छता निरीक्षक |
| ०८. | गौतम बबन कांबळे | प्रभारी स्वच्छता निरीक्षक |
| ०९. | सचिन तुकाराम मिसाळ | प्रभारी स्वच्छता निरीक्षक |
| १०. | लियाकत अली हुसैन अली शेख | प्रभारी स्वच्छता निरीक्षक |
| ११. | सुहास भाले | प्रभारी स्वच्छता निरीक्षक |
| १२. | सचिन राहुल खरात | प्रभारी स्वच्छता निरीक्षक |
| १३. | उमेश मोतीराम खरात | प्रभारी स्वच्छता निरीक्षक |
| १४. | इरफान मेहमुद बेग | प्रभारी स्वच्छता निरीक्षक |
| १५. | विजय मोहन मिसाळ | प्रभारी स्वच्छता निरीक्षक |
| १६. | अशोक चावरीया | प्रभारी स्वच्छता निरीक्षक |

करीता वरील कर्मचाऱ्यांना वाहन भत्ता वाढवून प्रतीमाह रू.२५००/- करण्यासाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल : या विषयामध्ये ०४ कायमस्वरूपी स्वच्छता निरीक्षक व १२ प्रभारी स्वच्छता निरीक्षक आहे. त्यांना रू.१५००/- वाहन भत्ता वाढून रू.२५००/- पर्यंत वाढ करावयाची आहे. विषय मंजूर करणेस हरकत नाही. परंतु यामध्ये मनपातील सर्व शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, दुय्यम आवेक्षक व इमारत निरीक्षक यांना यापूर्वी रू.८००/- व दि.२९/०१/२०१४ पासून रू.१५००/- प्रतिमाह वाढवून दिलेला आहे. त्यांनाही रू.३०००/- वाहन भत्ता देण्यांत यावा.

मा.सभापती : स.सदस्यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे या विषयामध्ये मा.आयुक्तांनी आर्थिक परिस्थिती लक्षात घेवून आपल्या स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा. विषय मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घनकचरा व्यवस्थापन विभाग व वॉर्ड कार्यालयात कार्यरत प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.०१ ते १६ मधील ४ स्थायी स्वच्छता निरीक्षक व १२ प्रभारी स्वच्छता निरीक्षक यांचेकडे प्रत्येकी ३ ते ४ वॉर्डाचे कार्यक्षेत्र असल्यामुळे, त्यांच्या वाहनांना दररोज १.५ लिटर पेट्रोल लागते. त्यांना सद्यस्थितीत देण्यांत येणारे दरमाह रू.१५००/- वाहनभत्ता वाढवून प्रतीमाह रू.२५००/- वाहन भत्ता करण्यास मंजुरी देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे मा.आयुक्त यांनी आर्थिक परिस्थिती लक्षात घेवून मनपातील सर्व शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, दुय्यम आवेक्षक व इमारत निरीक्षक यांच्या वाहन भत्त्यामध्ये वाढ करणेसंबंधी आपल्या स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा, यासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. २७१ :</u>**

विषय : चार घनकचरा प्रक्रिया केंद्रावर Weigh Bridge (वजन काटा) आणि RFID उभारणे.

संदर्भ : Tender ID- 2018-AMCA-382157-3

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | घनकचरा व्यवस्थापन विभाग |
| २ | कामाचे स्वरुप | चार घनकचरा प्रक्रिया केंद्रावर Weigh Bridge (वजन काटा) आणि RFID उभारणे. |

| | | |
|---|---|---|
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, एकत्रित डी.पी.आर. र.रू.११.७९५ कोटी, मान्यता दि.०२/०४/२०१८ |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | एजन्सीकडून देकार दर स्वरूपात |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | जिल्हा स्तरावरील वर्तमानपत्रे मराठी ०१, राज्यस्तरीय वर्तमानपत्रे मराठी ०१, इंग्लिश |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दिनांक ०७/१२/२०१८ ते १८/१२/२०१८<br>दिनांक २१/१२/२०१८ ते २९/१२/२०१८<br>दिनांक ३१/१२/२०१८ ते ०८/१२/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | १० जानेवारी २०१९ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | एक (०१) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | एंडेवर इन्स्टुमेंट प्रा.लि. | र.रू.७१,१०,०००/- | First Lowest |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय?<br>ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | होय,<br>नाही,<br>--- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे.<br><br>अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | शासन निधी<br><br>होय. |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | आहे. |

एंडेवर इन्स्टुमेंट प्रा.लि. यांनी ४ वजन काटे उभारणे र.रू.५६,७०,०००/- व RFID पुरवणेसाठी र.रू.१४,४०,०००/- असे एकूण ७१,१०,०००/- निविदेमध्ये रक्कम नमुद करण्यात आली होते. दि.२८/०१/२०१९ रोजी मा.आयुक्त यांच्या दालनामध्ये झालेल्या वाटाघाटीअंती संबंधीत गुत्तेदारानी र.रू.५६,७०,०००/- मध्ये २.५ टक्के कमी करून र.रू.५५,२८,२५०/- व र.रू.१४,४०,०००/- मध्ये २.५ टक्के कमी करून र.रू.१४,०४,०००/- असे एकूण र.रू.६९,३२,२५०/- दराने काम करण्यास सहमती दर्शविली आहे.

तरी विषयांकित काम ठेकेदार एंडेवर इन्स्टुमेंट प्रा.लि. यांचेकडून टेंडर र.रू.६९,३२,२५०/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील सुत्रानुसार अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चार घनकचरा प्रक्रिया केंद्रावर Weigh Bridge (वजन काटा) आणि RFID उभारणे करीता प्राप्त झालेल्या निविदाधारक एंडेवर इन्स्टुमेंट प्रा.लि. यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार ठेकेदार एंडेवर इन्स्टुमेंट प्रा.लि. यांचेकडून टेंडर र.रू.६९,३२,२५०/- पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील सुत्रानुसार अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. २७२ :**

विषय : वार्ड क्र.१०७ ईटखेडा अंतर्गत साई वृंदावन कॉलनी येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेत बॅटमिंटन हॉल बांधणे व विकसीत करणे या कामाचे ठेकेदार मे.पदमावती कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच निविदा रक्कम रू.३५,२३,६०५/- पर्यंत (जीएसटी) वगळून करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : निविदा दि.०१/०१/२०१९

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | वार्ड अभियंता कार्यालय क्र.०८ |
| २ | कामाचे स्वरुप | इमारत बांधकाम |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | ४८,९०,०००/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ३५,२३,६०५/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | महा ई निविदेद्वारे व दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दीद्वारे |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | २० फेब्रुवारी २०१९ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०१ मार्च २०१९ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०१ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.पदमावती कन्स्ट्रक्शन | ३५,२३,६०५/- | अंदाजपत्रकीय दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय?<br>ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | होय,<br>नाही,<br>--- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे.<br><br>अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | व्यापारी संकुले व इतर इमारती<br><br>होय. |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिती सभा दि.३१/०७/२०१८ विषय क्र.४३ |

तरी विषयाकिंत काम ठेकेदार मे.पदमावती कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.३५,२३,६०५/- पर्यंत (जीएसटी) वगळून करून घेणेचा व करार करणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : ऐनवेळीचे विषय क्र.२७२ ते २७६ मंजुर करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१०७ ईटखेडा अंतर्गत साई वृंदावन कॉलनी येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेत बॅटमिंटन हॉल बांधणे व विकसीत करणे या कामासाठी प्राप्त निविदाधारक ठेकेदार मे.पदमावती कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच निविदा रक्कम रू.३५,२३,६०५/- पर्यंत (जीएसटी) वगळून करून घेणेस व करार करणेस मान्यता देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार पदमावती कन्स्ट्रक्शन यांनी सबलेट करणेसाठी पत्र दिलेले असल्यामुळे तो अधिकार स्थायी समितीला नसल्याने, सबलेट करणे संबंधी प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा, यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७३ :**

विषय : वार्ड क्र.१०७ ईटखेडा अंतर्गत अभिनंदन हौसींग सोसायटी येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेत बॅटमिंटन हॉल बांधणे व विकसीत करणे या कामाचे ठेकेदार मे.पदमावती कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच निविदा रक्कम रू.३५,२३,६०५/- पर्यंत (जीएसटी) वगळून करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : निविदा दि.२६/०२/२०१९

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | वार्ड अभियंता कार्यालय क्र.०८ |

| | | |
|---|---|---|
| २ | कामाचे स्वरुप | इमारत बांधकाम |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | ४८,९०,०००/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ३५,२३,६०५/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | महा ई निविदेद्वारे व दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दीद्वारे |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | २८ जानेवारी २०१९ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०१ मार्च २०१९ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०१ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.पदमावती कन्स्ट्रक्शन | ३५,२३,६०५/- | अंदाजपत्रकीय दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय?<br>ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय?<br>असल्यास कारणे नमुद करावीत. | होय,<br>नाही,<br>--- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे.<br><br>अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | व्यापारी संकुले व इतर इमारती<br><br>होय. |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिती सभा दि.३१/०७/२०१८ विषय क्र.४२ |

तरी विषयाकिंत काम ठेकेदार मे.पदमावती कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.३५,२३,६०५/- पर्यंत (जीएसटी) वगळून करून घेणेचा व करार करणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. प्रकरणी शासन निर्णय व मार्गदर्शनानुसार जीएसटी स्वतंत्र देय राहील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१०७ ईटखेडा अंतर्गत अभिनंदन हौसींग सोसायटी येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेत बॅटमिंटन हॉल बांधणे व विकसीत करणे या कामासाठी प्राप्त निविदाधारक ठेकेदार मे.पदमावती कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच निविदा रक्कम रू.३५,२३,६०५/- पर्यंत (जीएसटी) वगळून करून घेणेस व करार करणेस मान्यता देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार पदमावती कन्स्ट्रक्शन यांनी सबलेट करणेसाठी पत्र दिलेले असल्यामुळे तो अधिकार स्थायी समितीला नसल्याने, सबलेट करणे संबंधी प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा, यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७४ :**

विषय : वार्ड क्र.१०७ ईटखेडा अंतर्गत रेल्वेस्टेशन उड्डाणपुला खालील स्टॅंडर्ड सिल्कमिल कॉलनी अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रेटींग करणे या कामाचे ठेकेदार मे.पदमावती कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच निविदा रक्कम रू.२६,७३,८३९/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : निविदा दि.०१/०१/२०१९

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | वार्ड अभियंता कार्यालय क्र.०८ |

| | | |
|---|---|---|
| २ | कामाचे स्वरुप | काँक्रीट रस्ते |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | २९,९५,२३६/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | २६,७३,८३९/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | महा ई निविदेद्वारे व दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दीद्वारे |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | २२ फेब्रुवारी २०१९ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०१ मार्च २०१९ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०१ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.पदमावती कन्स्ट्रक्शन | २६,७३,८३९/- | अंदाजपत्रकीय दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय?<br>ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय?<br>असल्यास कारणे नमुद करावीत. | होय,<br>नाही,<br>--- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे.<br><br>अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | नविन काँक्रीट रस्ते<br><br>होय. |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिती सभा दि.११/०१/२०१८ विषय क्र.२२१ |
| तरी विषयांकित काम ठेकेदार मे.पदमावती कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.२६,७३,८३९/- पर्यंत करून घेणेचा व करार करणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१०७ ईटखेडा अंतर्गत रेल्वेस्टेशन उड्डाणपुला खालील स्टॅंडर्ड सिल्कमिल कॉलनी अंतर्गत रस्त्यांचे काँक्रेटींग करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार मे.पदमावती कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच निविदा रक्कम रू.२६,७३,८३९/- पर्यंत काम करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७५ :**

विषय : झोन क्र.६ अंतर्गत तिरूमला मंगल कार्यालय ते जयभवानीनगर शिवाजी चौक पर्यंत दुभाजक बांधणे या कामाचे ठेकेदार मे.एलोरा कन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपर्स यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.४८,८७,९०८.३९/- पर्यंत करून घेणे अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र.२०१८-एएमसीए-३२५९९६-४

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | अभियंता झोन क्र.०६ |
| २ | कामाचे स्वरुप | दुभाजक बांधणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ४८८७९०८.३९ |

| | | |
|---|---|---|
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई महासेल निविदा सूचना दि.११/०६/२०१८ |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | --- |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | २८/०९/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०१ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| **अ.क्र.** | **ठेकेदाराचे नाव व पत्ता** | **टेंडर रक्कम रुपये** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त** |
|---|---|---|---|
| ०१. | मे.एलोरा कन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपर्स | ४८८७९०८.३९ | २.०० टक्के कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | --- |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | मा.महापौर यांनी सूचविलेली अत्यावश्यक कामे. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिती सभा दि.२८/०३/२०१८ विषय क्र.३४९ |
| तरी विषयाकिंत काम ठेकेदार मे.एलोरा कन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपर्स यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.०० टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.४८८७९०८.३९ पर्यंत करून घेणेस टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.६ अंतर्गत तिरूमला मंगल कार्यालय ते जयभवानीनगर शिवाजी चौक पर्यंत दुभाजक बांधणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार मे.एलोरा कन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपर्स यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.४८,८७,९०८.३९/- पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७६ :**

विषय : औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात ध्वनीक्षेपण व्यवस्था, व्हिडीओ व्यवस्था, प्रोजेक्टर व पडदे सहीत स्थापीत करणे, या कामाचे ठेकेदार मे.न्यु इरा इलेक्ट्रीकल्स यांचेकडून १५.०० टक्के जास्त दराची निविदा जास्त दराने म्हणजेच र.रू.७०,३१,२७१/- मध्ये प्रस्तावित काम करणेस अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी. क्र.२०१८-एएमसीए-३७०२१९-४

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | विद्युत विभाग |
| २ | कामाचे स्वरुप | औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारती मधील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात ध्वनीक्षेपण व्यवस्था, व्हिडीओ व्यवस्था,प्रोजेक्टर व पडदे सहित स्थापीत करणे. |

| | | |
|---|---|---|
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, ७२१४६९५.०० |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ६१,१४,१४९.०० |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | दै.लोकमत, दै.दिव्य मराठी व इतर दिनांक १६/०९/२०१८ |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | २४/१२/२०१८ ते २९/१२/२०१८ पर्यंत चौथी वेळ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ३१/१२/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०१ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.न्यु इरा इलेक्ट्रिकल्स | ७०६१८४२/- | १५.५० टक्के |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय, निविदा समितीने मंजूर केलेले १५.०० टक्के जास्त |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | सदर कामाच्या निविदेस प्रतिसाद मिळत नसल्यामुळे, आणि मा.सर्वसाधारण सभेच्या ध्वनीक्षेपन व्यवस्थेचे काम करणे आवश्यक असल्यामुळे आणि प्राप्त निविदाकार दर कमी करण्यास तयार नसल्यामुळे १५ टक्के जास्त दराची शिफारस करण्यात आली आहे. |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | चार वेळेस निविदा काढण्यात आल्या असता, एकच निविदा प्राप्त झाली आहे. |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | मनपा इमारती |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | --- |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय. |

सदरील कामासाठी चार वेळा निविदा मागविण्यात आल्या असता प्रत्येकवेळी एकच निविदा प्राप्त झाली. चौथ्या वेळी प्राप्त झालेली निविदा ही १५.५० टक्के जास्त दराची असल्यामुळे, कंत्राटदारास निविदा समितीने अतिरिक्त आयुक्त यांचे दालनात बैठक बोलवून दर कमी करणेस सूचना केल्या असता, कंत्राटदाराने १५.५ टक्के जास्त दरा ऐवजी १५ टक्के जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविली. विविध कारणे मिमांसा, बाजारातील डॉलरचे वाढलेले दर, कंत्राटदारांना देयके अदा होणेसाठी लागणारा काळ व इतर विविध कारणास्तव त्यांनी ०.५ टक्के दर कमी केले आहे. १५.५० टक्के जास्त दराऐवजी १५ टक्के जास्त दराचा मे.न्यु इरा इलेक्ट्रीकल्स यांचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात ध्वनीक्षेपण व्यवस्था, व्हिडीओ व्यवस्था, प्रोजेक्टर व पडदे सहीत स्थापीत करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार मे.न्यु इरा इलेक्ट्रीकल्स यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून १५.५ टक्के जास्त दराऐवजी १५.०० टक्के जास्त दराने म्हणजेच र.रू.७०,३१,२७१/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७७ :**

विषय : संत एकनाथ रंगमंदिर येथील नव्याने विद्युतीकरण करणे या कामाचे ठेकेदार मे.न्यु इरा इलेक्ट्रीकल्स यांचेकडून -१.५० टक्के कमी दराची निविदा कमी दराने म्हणजेच र.रू.४३,१०,४६४/- मध्ये प्रस्तावित काम करणेस अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी. क्र.२०१८-एएमसीए-३८६८१७-२

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | विद्युत विभाग |
| २ | कामाचे स्वरुप | संत एकनाथ रंगमंदिर येथील नव्याने विद्युतीकरण करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, मा.स्थायी समिती ठराव क्र.१७ दि.१५/१२/२०१८ |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ४३७६१०५/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | दै.दिव्य मराठी दिनांक २१/१२/२०१८ |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ०५/०१/२०१९ पर्यंत |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०७/०१/२०१९ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०३ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.न्यु इरा इलेक्ट्रिकल्स | ४३१०४६३.९२/- | -१.५० टक्के कमी दराने |
| ०२. | मे.स्टर्लींग इलेक्ट्रिकल्स | ४८१८५२९.७७/- | १२.९९ टक्के जास्त दराने |
| ०३. | मे.जय इन्टरप्रायझेस | ४९४४५६१.६०/- | १२.९९ टक्के जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय. |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय. |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही. |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | संत एकनाथ रंग मंदिर येथील नुतणीकरण करणे. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | पुरेशी तरतुद उपलब्ध नसल्यामुळे म.म.अ.१९४९ चे कलम १०३ नुसार पुर्नविनियोजीत अर्थसंकल्पात वाढीव तरतुद उपलब्ध होणेस लेखा विभागाच्या अटीनुसार मा.स्थायी समितीची मान्यता आहे. |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय. |

विषयांकित कामासाठी पुर्नविनियोजीत अर्थसंकल्पात प्रथम प्राधान्याने लेखा विभागाने तरतुद उपलब्ध करून घेणेस तसेच तरतुद उपलब्ध होईल या अटीवर चालू कामाची देयके वेळोवेळी अदा करणेस आणि सदरील काम मे.न्यु इरा इलेक्ट्रीकल्स कंत्राटदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा -१.५० टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.४३१०४६४/- चे काम करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत सादर.

श्री.गजानन बारवाल : संत एकनाथ रंगमंदीराची सद्य परिस्थिती काय आहे, काय काम चालु आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

प्र.कार्य.अभि. (विद्युत) : संत एकनाथ रंगमंदीराचे विद्युत विभागाकडुन ए/सी चे काम ६० टक्के पूर्ण झाले आहे. कंत्राटदाराचे बिल तयार करुन लेखा विभागाकडे दिलेले आहे. त्याचप्रमाणे ध्वनीक्षेपन व्यवस्थापनासाठी ५० लाख रु. डिपीडीसी फंडातुन मिळाले होते. निविदा काढुन त्याचे काम चालु केलेले आहे. उर्वरित कामाचे सुधारीत अंदाजपत्रक सुध्दा केलेले आहे. विद्युतीकरणाच्या कामाचे ४७ लाख रु. टेंडर आहे. टेंडर मान्यतेच्या अंतिम टप्प्यात आहे या आठवड्यामध्ये मंजुरी घेऊन काम सुरु करणार आहे. जनरेटर लावण्याचे कामही सुरु करत आहोत. ३ ते ४ महिन्यामध्ये विद्युत विभागाचे सर्व काम पुर्ण होणार आहे. स्थापत्य विभागामार्फत सुध्दा कामे चालु आहे.

श्री.गजानन बारवाल : विषय मंजुर करण्यास हरकत नसावी.

मा.सभापती : विषय क्र.२७७ मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संत एकनाथ रंगमंदिर येथील नव्याने विद्युतीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.न्यु इरा इलेक्ट्रीकल्स यांचेकडून -१.५० टक्के कमी दराने म्हणजेच र.रू.४३,१०,४६४/- मध्ये प्रस्तावित काम करणेस अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७८ :**

फेर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर भुमिगत गटार योजना राबविण्यात येत असून या योजनेअंतर्गत शहरातील विविध भागात सिवेज ट्रिटमेंट प्लान्ट बांधण्यात आले आहेत. यामध्ये कांचनवाडी येथे १६१ द.ल.ली. झाल्टा येथे ३५ द.ल.ली. व पडेगाव येथे १० द.ल.ली. क्षमतेचे एसटीपी कार्यान्वीत करण्यात आले असून त्याद्वारे सद्यस्थितीत सुमारे ८० ते ८५ द.ल.ली. मलजलावर प्रक्रिया करून प्रक्रीयायुक्त नदीमध्ये सोडण्यात येत आहे. याबाबीला आजमितीस कोणताही पर्याय उपलब्ध नव्हता. मात्र महानगरपालिकेने शहरातील पाण्याचे दुर्भीक्ष विचारात घेता शहरातील बांधकाम व्यावसायीक यांना आवाहन केले असून बांधकामासाठी या पाण्याचा वापर करण्याचे सुचविले आहे. तसेच महानगरपालिकेकडे प्राप्त होणाया बांधकाम परवानगीमध्ये अट टाकुन सदर पाण्याचा वापर करणे बाबत सर्वसामान्य नागरीक/बांधकाम व्यावसायिक यांना बंधनकारक करणे बाबत महानगरपालिकेच्या नगर रचना विभागास विनंती करण्यात आली आहे. यासाठी महानगरपालिकेने उक्त तिन्ही एसटीपी जवळ टँकर फिलींग स्टेशन तयार करणे बाबत कार्यवाही हाती घेतली आहे. सदर स्वरूपाने पाण्याचा पुनर्वापर अल्प प्रमाणात का होईना पण होत आहे. महानगरपालिकेने जे एसटीपी उभारले आहे, त्यासाठी महावितरण कंपनीकडुन एक्सप्रेस फिडरद्वारे विद्युत जोडणी घेतली असून यासाठी एसटीपी मासीक वीज बील जे की मनपाने भरणे आवश्यक आहे. ते सुमारे ६० ते ७० लक्ष रूपये येत आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेचा उद्देश किमान विज बिलाचा खर्च पाणी विक्रीतून निघावा असा आहे.

या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे पत्र महानगरपालिकेस प्राप्त झाले असून सदर पत्रामध्ये पाण्याचा पुनर्वापर होणेसाठी किमान दरावर महानगरपालिकेने कंत्राटदारांना पाणी उपलब्ध करून द्यावे असे नमुद केले आहे. याच धर्तीवर त्यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ तसेच महाराष्ट्र समृध्दी महामार्ग काही प्रमाणात औरंगाबाद जिल्ह्यातून जात असल्याने, त्याच्या बांधणीसाठी याचा वापर करणे संबंधी कार्यवाही करून ट्रायपार्टी अ‍ॅग्रीमेंट करण्याबाबत मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी लेखी कळविले आहे. याच नुकतीच शिर्डी येथे मा.प्रधान सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली माहे ऑक्टोबर २०१८ मध्ये नागपुर, मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग (महाराष्ट्र समृध्दी महामार्ग) या विषयासंबंधी बैठक संपन्न झाली असून त्यांनी महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेले प्रक्रीयायुक्त पाणी या महामार्गाच्या बांधकामासाठी खरेदी करण्याची व वापरण्याची तयारी दर्शविलेली आहे. यासाठीचे पाणी घेऊन जाण्यासाठीचे संपूर्ण इन्फ्रास्ट्रक्चर ते स्वतः उभारणार आहेत. या व्यतिरिक्त स्थळावर फ्लोमिटर बसविणे, विद्युत मिटर लावणे त्यासाठी येणार विद्युत देयकाचा खर्च ते स्वतः उचलणार आहेत. जी किरकोळ खरेदी पाण्याची ग्राहक करणार आहे, त्यासाठी प्रति हजार लिटर प्रमाणे किरकोळ पाणी विक्रीचा दर आकारण्यात येईल व त्या मर्यादेपर्यंत त्यांच्याकडून लागलेल्या विद्युत युनिट प्रमाणे चार्जेस वसूल करण्यांत येतील.

या विषयाच्या अनुषंगाने या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीची बैठक घेतली असता व कार्यरत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) यांच्या मदतीने पाण्याचा बल्क कंझुमर्स दर काढला असता, तो पूर्वीच्या ५/- प्रती हजार लिटर ऐवजी रू.१०/- व किरकोळ विक्रीसाठी पूर्वीचा रू.७/- ऐवजी रू.१५/- प्रती हजार लिटर निश्चित करण्यात आला आहे. या पूर्वी सदरचा विषय मा.स्थायी समिती समोर विषय क्र.१७६ दि.१४/०१/२०१९ अन्वये ठेवण्यात आला होता. व तो मा.स्थायी समितीने मंजूर केला आहे. मात्र दरात किरकोळ फेरबदल झाल्याने व सदरची बाब कार्यालयासाठी सहायभुत असल्याने व यातून विद्युत देयकाचा खर्च काढण्यास मदत होणार असल्याने, सदरचा प्रस्ताव फेर मान्यतेसाठी मा.स्थायी समिती सभेसमोर सादर करण्यात येत आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल : प्रस्तावा बाबत माहिती देण्यात यावी. प्रशासनाने रु.५/- दराने प्रस्ताव ठेवला होता.

कार्य.अभियंता(ड्रेनेज) : मागिल प्रस्तावामध्ये तत्कालिन आयुक्त म्हणुन जिल्हाधिकारी होते. त्यांच्याकडे चार्ज होता त्यावेळेस चर्चा झाली होती. सुरुवातील ५ रुपये दर ठरवले होते. त्यावर फेर विचार करुन रु.१० केले आहे.

मा.सभापती : वाढीव दरास मान्यता देण्यात येते. विषय मंजुर.

श्री.गजानन बारवाल : मागच्या बैठकीत पाणी चोरी करण्याबाबत श्रीमती देसरडा ताई यांनी प्रश्न उपस्थित केला होता. महानगरपालिकेतर्फे चित्रिकरण करण्यासाठी श्री.गणेश सोनवणे यांना त्या कामासाठी नेमले होते. त्या ठिकाणी नागरीकांकडुन त्यांची बॅग हिसकावण्यात आली. त्यांच्या कॅमेऱ्याचे नुकसान झाले आहे. त्यांची नेमणूक महापालिकेतर्फे करण्यात आली होती. त्यामुळे त्यांची नुकसान भरपाई म्हणुन त्यांना त्यांच्या कॅमेऱ्याचे पैसे देण्यात यावे.

कार्य.अभियंता(ड्रेनेज) : सुकना नदीच्या काठावरील जे शेतकरी आहेत ते मोटारी लावुन इललिगल पध्दतीने पाणी चोरी करत आहेत. ६ तारखेला तिथे ड्राईव्ह घ्यावा लागला. त्यांचे साहित्य जप्त करावे लागले. पोलिस बंदोबस्त सुध्दा सोबत होता. तिथे दगडफेक सुध्दा झाली होती. यामध्ये फोटोग्राफर श्री.गणेश सोनवणे यांची बॅग हिसकावुन घेतली होती.

श्री.गजानन बारवाल : आतापर्यंत त्याचा गुन्हा नोंदवण्यात आलेला नाही. त्या व्यक्तीचे नुकसान झाले आहे. त्याची भरपाई सुध्दा करण्यात आलेली नाही.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : श्री.गणेश सोनवणे हे छायाचित्रीकरण करत असतांना त्यांचे जे नुकसान झाले आहे. त्याची भरपाई करुन देण्यात यावी.

मा.सभापती : गुन्हा दाखल का करण्यात आला नाही.

कार्य.अभियंता(ड्रेनेज) : श्री.सोनवणे यांना मी स्वतः पोलिस स्टेशनला तक्रार घेऊन पाठवले होते. त्यांनी सांगितले की, यावर गुन्हा दाखल करुन घेतो परंतु मा.आयुक्तांची मान्यता घ्यावी लागेल.

मा.सभापती : श्री.गणेश सोनवणे यांचे जे नुकसान झाले आहे. प्रशासनाला सुचना करण्यात येते की, महापालिकेने त्यांची नुकसान भरपाई करुन देण्यात यावी, विषय क्र.२७८ मंजुर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर भुमिगत गटार योजना राबविण्यात येत असून या योजनेअंतर्गत शहरातील कांचनवाडी येथे १६१ द.ल.ली. झाल्टा येथे ३५ द.ल.ली. व पडेगाव येथे १० द.ल.ली. क्षमतेचे बांधण्यात आलेल्या सिवेज ट्रिटमेंट प्लान्टद्वारे सद्यस्थितीत सुमारे ८० ते ८५ द.ल.ली. मलजलावर प्रक्रिया करून प्रक्रीयायुक्त पाणी नदीमध्ये सोडण्यात येत असल्यामुळे तसेच महानगरपालिकेने जे एसटीपी उभारले आहे, त्यासाठी महावितरण कंपनीकडुन एक्सप्रेस फिडरद्वारे विद्युत जोडणी घेतली असल्याने, यासाठी एसटीपी मासीक वीज बील सुमारे ६० ते ७० लक्ष रूपये येत असून हा खर्च पाणी विक्रीतून निघावा या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे पत्र महानगरपालिकेस प्राप्त झाले असून सदर पत्रामध्ये पाण्याचा पुनर्वापर होणेसाठी किमान दरावर महानगरपालिकेने कंत्राटदारांना पाणी उपलब्ध करून द्यावे असे नमुद केले असल्याने व याच धर्तीवर त्यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ तसेच महाराष्ट्र समृध्दी महामार्ग काही प्रमाणात औरंगाबाद जिल्ह्यातून जात असल्याने, त्याच्या बांधणीसाठी याचा वापर करणे संबंधी कार्यवाही करून ट्रायपार्टी ॲग्रीमेंट करण्याबाबत मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी लेखी कळविले असल्यामुळे, याच संदर्भात नुकतीच शिर्डी येथे मा.प्रधान सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली माहे ऑक्टोबर २०१८ मध्ये नागपुर, मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग (महाराष्ट्र समृध्दी महामार्ग) या विषयासंबंधी बैठक संपन्न झाली असून त्यांनी महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेले प्रक्रीयायुक्त

पाणी या महामार्गाच्या बांधकामासाठी खरेदी करण्याची व वापरण्याची तयारी दर्शविलेली आहे. यासाठीचे पाणी घेऊन जाण्यासाठीचे इन्फ्रास्ट्रक्चर ते स्वतः उभारणार असून, या व्यतिरिक्त स्थळावर फ्लोमिटर बसविणे, विद्युत मिटर लावणे त्यासाठी येणार विद्युत देयकाचा खर्च ते स्वतः उचलणार असल्याने, जी किरकोळ खरेदी पाण्याची ग्राहक करणार आहे, त्यासाठी प्रति हजार लिटर प्रमाणे किरकोळ पाणी विक्रीचा दर आकारण्यात येईल व त्या मर्यादेपर्यंत त्यांच्याकडून लागलेल्या विद्युत युनिट प्रमाणे चार्जेस वसूल करणेस व कार्यरत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) यांच्या मदतीने पाण्याचा बल्क कंझुमर्स दर पूर्वीच्या ५/- प्रती हजार लिटर ऐवजी रू.१०/- व किरकोळ विक्रीसाठी पूर्वीचा रू.७/- ऐवजी रू.१५/- प्रती हजार लिटर या निश्चित करण्यात आलेल्या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. २७९ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिके मार्फत नागरी सुविधांसाठी टॉयलेट व्हॅन व व्हॅक्युम/जेटींग मशिनरी उपलब्ध आहेत. शहरातील विविध सामाजिक उपक्रम, धार्मिक कार्यक्रम, विविध संस्थांचे वैयक्तिकरीत्या होणारे उपक्रम यासाठी ज्याठिकाणी अनेक नागरीक उपस्थित असणार आहेत अशा ठिकाणी मनपाच्या मोबाईल टॉयलेट व्हॅनची मागणी होत असते अशा ठिकाणी महानगरपालिकेतर्फे नाममात्र शुल्क आकारुन टॉयलेट व्हॅन उपलब्ध करुन देण्यात येतात. आजमितीस महानगरपालिकेकडे एकूण ०३ मोबाईल टॉयलेट व्हॅन (१० सीटर क्षमतेचे) उपलब्ध आहेत.

तसेच शहरातील अशा वसाहती आहेत ज्याठिकाणी ड्रेनेज लाईनची सुविधा उपलब्ध नाही किंवा मोठमोठे गृहप्रकल्प ज्याठिकाणी सांडपाणी साठविण्यासाठी सेप्टीक टँकची व्यवस्था केलेली असते अशा सेप्टीक टँक रिकामे करण्यासाठी व्हॅक्युम मशिनची मोठया प्रमाणावर मागणी असते अशा नागरीकांना देखील महानगरपालिकेकडे असलेल्या ०२ व्हॅक्युम मशिनद्वारे (७००० लिटर क्षमता) नाममात्र शुल्क आकारुन व्हॅक्युम मशिन उपलब्ध करुन देण्यात येतात.

त्याचप्रमाणे महानगरपालिकडे उपलब्ध असलेले लहान मोठे आकाराचे एकूण १२ जेटींग मशिन आहेत सदरच्या जेटींग मशिनद्वारे महानगरपालिका हद्दितील ड्रेनेज लाईनचे चोकअप काढण्याचे काम प्राधान्याने करण्यात येते.तथापी छावणी नगरपरिषद, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, एमजीएम व इतर काही मोठया संस्थांअंतर्गत असणारे त्याचे स्वतंत्र ड्रेनेज लाईन चोकअपचे काम नाममात्र शुल्क आकारुन करण्यात येते.

सदर टॉयलेट हे सन २००८-०९ मध्ये खरेदी करण्यात आले होते. त्यावर्षी असणारे एकंदरीत खर्चाचा अंदाज बघता प्रतिदिन रु.५००/- टॉयलेट व्हॅन भाडे व साफसफाई खर्च रु.२५०/- अशी आकारणी आजपर्यंत मागील १० ते १२ वर्षापासून चालू आहे. त्याचप्रमाणे उपलब्ध व्हॅक्युम मशिनद्वारे सेप्टीक टँक रिकामे करण्यासाठी रु.६/- प्रति घनफुट दराने सेप्टीक टँकचे आकारानुसार शुल्क आकारण्यात येऊन रु.०१/- प्रति घनफुट साफसफाई लेबर चार्जेस खर्च सन २००७-०८ पासून म्हणजेच १० ते १२ वर्षापासून आकारण्यात येतो.

उपरोक्त नमुद प्रमाणे आवश्यक त्या मागणीनुसार जेटींग मशिनद्वारे ड्रेनेज चोकअप काढण्यासाठी रु.२५/- प्रति रनिंग फुट व साफसफाई लेबर चार्जेस रु.१०/- रनिंग फुट प्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येते.

तथापि आजमितीस डिझेलचे वाढलेले दर, कर्मचाऱ्यांचे वाढलेले वेतन, सदर टॉयलेट व्हॅन, व्हॅक्युम/जेटींग मशिनची देखभाल दुरुस्ती असा सदरचा सर्व एकंदरीत खर्च पाहाता उपरोक्त सद्यस्थितीत असलेले दर परवडणारे नाहीत करीता सद्यपरिस्थितील खर्च पाहाता मोबाईल टॉयलेट व्हॅन व व्हॅक्युम/जेटींग मशिन वापरासाठी खालिलप्रमाणे दर आकारणी व्हावी सदरची आकारणी देखील आजरोजी मनपास सदरची सुविधा पुरविणेसाठी लागणारा उपरोक्त प्रमाणे इंधन,वेतन,देखभाल दुरुस्ती खर्च पाहाता नाममात्र शुल्कवाढीचा प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.

**अ) मोबाईल टॉयलेट व्हॅन :- (१० सिटर)**

| अ.क्र. | वापराचा प्रकार | सद्यस्थितीत असलेले दर | वाढीव प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| ०१ | प्रति दिन भाडे | रु. ५००/- प्रति दिन | रु. १२५०/- प्रति दिन |
| ०२ | साफसफाई खर्च (प्रति वेळेस) | रु. २५०/- | रु. २५०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | टँकमधील जमा झालेला मल व्हॅक्युम मशिनद्वारे उपसा करण्यासाठीचा खर्च | ---- | रु. ५००/- प्रति ट्रिप |

**ब) व्हॅक्युम मशिन :- (७००० लिटर क्षमता)**

| अ.क्र. | वापराचा प्रकार | सद्यस्थितीत असलेले दर | वाढीव प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| ०१ | सेप्टीक टँक उपसा खर्च | रु. ०६/- प्रति घनफुट | रु. १५/- प्रति घनफुट |
| ०२ | साफसफाई खर्च | रु. ०१/- प्रति घनफुट | रु. ०२/- प्रति घनफुट |

**क) जेटींग मशिन :- (४००० ते ६००० लिटर क्षमता ०६ मशिन, २००० लिटर क्षमता ०६ मशिन)**

| अ.क्र. | वापराचा प्रकार | सद्यस्थितीत असलेले दर | वाढीव प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| ०१ | विविध साईजच्या ड्रेनेजलाईचे जेटींग मशिनद्वारे चोकअप काढणे | रु. २५/- रनिंग फुट | रु. ५०/- रनिंग फुट |
| ०२ | लेबर चार्जेस | रु. १०/- रनिंग फुट | रु. १५/- रनिंग फुट |

मोबाईल टॉयलेट व्हॅन शहरातील सार्वजनिक कार्यक्रम/जयंती उत्सव (जसे की, गणेशोत्सव मिरवणुक, शिवजयंती मिरवणुक.डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुक), राष्ट्रीय सण (प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, महाराष्ट्र दिन, मराठवाडा मुक्ती संग्राम दिन) आणि विविध शासकिय कार्यक्रम जसे कि विविध निवडणुकांसाठी असणारे कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण व इतर निवडणुक विषयक कार्यक्रम यासाठी सदरची टॉयलेट व्हॅन महानगपालिकेमार्फत मोफत उपलब्ध करण्यात येते. यासर्व कार्यक्रमांसाठी सदरची टॉयलेट व्हॅन यापुढेही मोफत पुरविण्यात येईल.

मोबाईल टॉयलेट व्हॅन, व्हॅक्युम/जेटींग मशीन वापराबाबत शुल्क भरणा केल्यानंतर प्रत्यक्ष स्थळावर अर्जदाराकडून काही तांत्रिक कारणास्तव वापर होऊ शकला नाही अशा वेळी भरणा शुल्क कोणत्याही सबबीवर संबंधितास परत होणार नाही याबाबत मान्यतेस्तव सादर.

तसेच मागील काही दिवसांपासून मोबाईल टॉयलेट व्हॅनची औरंगाबाद महानगरपालिका हद्दिबाहेरील कार्यक्रमांसाठी मागणी होत आहे.तथापी औरंगाबाद महानगरपालिके मार्फत उपरोक्त मोबाईल टॉयलेट व्हॅन या शहरातील नागरी सुविधांसाठीच्या वापरासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहे.शहरहद्दीबाहेर मोबाईल टॉयलेट व्हॅनची वाहतुक करतांना अपघात झाल्यास कायदेशीर अडचण निर्माण होण्याची शक्यता असते. तसेच बाहेर गावच्या वाहतुकीमुळे देखभाल दुरुस्तीचा खर्चही मोठया प्रमाणात निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर वाहनांपासून मिळणारे उत्पन्नापेक्षा शहरहद्दीबाहेर मोबाईल टॉयलेट व्हॅन उपलब्ध करुन देण्यास महानगरपालिकेस खर्चीक बाब आहे व मुख्यतः औरंगाबाद महानगरपालिका हद्दितील उपक्रमांसाठी सोय म्हणून सदरच्या टॉयलेट व्हॅन मनपाने नागरीकांसाठी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. करीता मनपा हद्दीबाहेर असणाऱ्या कोणत्याही उपक्रमास व्हॅन उपलब्ध होणार नाही याबाबत मान्यता होणेस विनंती आहे.

उपरोक्त प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेकडे असलेल्या मोबाईल टॉयलेट व्हॅन, व्हॅक्युम/जेटींग मशीन वापरासंबंधी किराया दरवाढीचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेकडे असलेल्या मोबाईल टॉयलेट व्हॅन, व्हॅक्युम/जेटींग मशीन वापरासंबंधी प्रशासनाने सादर केलेल्या किरायाच्या वाढीव प्रस्तावित दरास खालीलप्रमाणे सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**अ) मोबाईल टॉयलेट व्हॅन :- (१० सिटर)**

| अ.क्र. | वापराचा प्रकार | मान्य झालेले वाढीव प्रस्तावित दर |
|---|---|---|
| ०१ | प्रति दिन भाडे | रु. १२५०/- प्रति दिन |
| ०२ | साफसफाई खर्च (प्रति वेळेस) | रु. २५०/- |
| ०३ | टँकमधील जमा झालेला मल व्हॅक्युम मशिनद्वारे उपसा करण्यासाठीचा खर्च | रु. ५००/- प्रति ट्रिप |

**ब) व्हॅक्युम मशिन :- (७००० लिटर क्षमता)**

| अ.क्र. | वापराचा प्रकार | मान्य झालेल वाढीव प्रस्तावित दर |
|---|---|---|
| ०१ | सेप्टीक टँक उपसा खर्च | रु. १५/- प्रति घनफुट |
| ०२ | साफसफाई खर्च | रु. ०२/- प्रति घनफुट |

**क) जेटींग मशिन :-(४००० ते ६००० लिटर क्षमता ०६ मशिन,२००० लिटर क्षमता ०६ मशिन)**

| अ.क्र. | वापराचा प्रकार | मान्य झालेल वाढीव प्रस्तावित दर |
|---|---|---|
| ०१ | विविध साईजच्या ड्रेनेजलाईचे जेटींग मशिनद्वारे चोकअप काढणे | रु. ५०/- रनिंग फुट |
| ०२ | लेबर चार्जेस | रु. १५/- रनिंग फुट |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८० :**

मा.आयुक्त यांच्या मान्यतेने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवा आहे. शहरात तारांकित हॉटेल्स, रेस्टॉरंट, बिअरबार, परमीट रूम, लॉजींग, खाणावळ, कारखाने, मंगल कार्यालय, फंक्शन हॉल, सिनेमागृह, पेट्रोल व डिझेल पंप, एल.पी.जी. गॅस पंप, रॉकेल एजन्सी, कमर्शियल बिल्डींग, रेसीडेन्सीयल बिल्डींग, स्वॉ मील, मोबाईल टॉवर्स, गॅस गोडाऊन, अल्कोहोल साठा, स्पिरीट साठा, फटाका शॉप, प्रदर्शन व इतर व्यवसाय धारकांसाठी अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येते.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम २००९ नुसार औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासह संपूर्ण महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रामध्ये लागू करण्यात आलेले आहेत. मा.संचालक, महाराष्ट्र अग्निशम सेवा संचालनालय, अग्निशमन सेवा अकादमी, मुंबई यांच्याकडून मान्यता प्राप्त एजन्सीकडून सर्व व्यवसायाचे फायर ऑडिट/सर्वेक्षण मान्यता प्राप्त एजन्सीकडून करावयाचे आहे.

फायर ऑडीट करण्यासाठी वर्तमानपत्रात जाहीर प्रगटन देण्यात येऊन खालील एजन्सीधारकांनी अर्ज सादर केले आहे. इच्छुक एजन्सीधारकांची कागदपत्रांची पूर्तता करून खालील एजन्सीधारकांना ११५ वॉर्डात अटी व शर्तीच्या अधीन राहून फायर ऑडीट करून घ्यावयाचे आहे.

**फायर ऑडीट/सर्वेक्षण करण्यासाठी नियम व अटी खालील आहे.**

०१. मा.संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी मुंबई यांच्याकडून मान्यता प्राप्त एजन्सी असणे आवश्यक आहे.

०२. शहरातील मनपा वॉर्ड १ ते ९ मधील प्रत्येक वॉर्ड मध्ये एक किंवा दोन एजन्सी फायर ऑडिट/सर्वेक्षणचे काम पाहतील.

०३. मुदत एक वर्षाकरीता राहील. मध्यंतरी सोडल्यास आपली एजन्सी काळ्या यादीमध्ये जोडण्यात येईल.

०४. एजन्सीधारकांनी आपल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र व आपले लायसन्स अग्निशमन विभागात सादर करणे आवश्यक राहील.

०५. ज्या व्यवसायधारकांनी अग्निशमन विभागाचे अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले नाही अशा व ज्यांनी घेतलेले आहे अशा सर्व व्यवसायांचे फायर ऑडीट/सर्वेक्षण करून अग्निशमन विभागात कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहेत.

०६. अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र घेतल्यानंतर अग्निशमन सुरक्षा उपकरणाची पुर्तता करून एजन्सीमार्फत ए फॉर्म सादर करावा लागेल व प्रत्येक वर्षी जानेवारी मध्ये बी फॉर्म सादर करावा लागेल.

०७. एजन्सीधारकांनी आपली कागदपत्र सात दिवसाच्या आत सादर करावीत.

०८. व्यवसायधारकांच्या व्यवसायाचे फायर ऑडिट करण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी फायर ऑडिट केले आहे, त्याठिकाणी नवीन अग्निशमन सुरक्षा उपकरणे बसविणे किंवा अग्निशमन सुरक्षा उपकरणे बसविलेली असल्यास त्याचा रिफलींग करण्याचे काम एजन्सीधारकास दिले जाईल व संबंधीत व्यवसायधारकाकडून त्याचा मोबदला घेता येईल.

०९. फायर ऑडिट विनाशुल्क करावे लागेल याचा मोबदला अग्निशमन विभागाकडून देण्यात येणार नाही.

१०. मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचा निर्णय अंतिम राहील.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | अकादमीची मान्यता | अनुभव प्रमाणपत्र | लायसन्स नुतणीकरण | लायसन्स नुतणीकरण दिनांक | वॉर्ड १ ते ११५ |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | जय बजरंग फायर सर्व्हिसेस | आहे | आहे | आहे | २२/१०/२०१९ | ०१ ते १० |
| ०२. | अंडवांटेजसाई प्रोजेक्टस् प्रा.लि. | आहे | आहे | आहे | २९/०५/२०१९ | ११ ते २० |
| ०३. | टर्नकी प्रोजेक्टस सल्युशन | आहे | आहे | आहे | २०/०२/२०१९ | २१ ते ३० |
| ०४. | रूद्राणी फायर सर्व्हीसेस | आहे | आहे | आहे | २३/०४/२०१९ | ३१ ते ४० |
| ०५. | मॅक्ससेफ फायर सर्व्हीसेस | आहे | आहे | आहे | २०/०२/२०१९ | ४१ ते ५० |
| ०६. | ग्राफिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | आहे | आहे | आहे | ०९/०७/२०१९ | ५१ ते ६० |
| ०७. | फायर ब्रेक फायर सर्व्हीसेस | आहे | आहे | आहे | २९/०५/२०१९ | ६१ ते ७० |
| ०८. | मारूती एंटरप्रायझेस | आहे | आहे | आहे | १२/११/२०१९ | ७१ ते ७९ |
| ०९. | श्री. सर्व्हीसेस | आहे | आहे | आहे | २१/१२/२०१८ | ८० ते ८८ |
| १०. | के.व्ही. कार्पोरेशन | आहे | आहे | आहे | २२/१०/२०१९ | ८९ ते ९७ |
| ११. | साई फायरवेल इंजिनिअरींग | आहे | आहे | आहे | १८/१०/२०१९ | ९८ ते १०६ |
| १२. | केशर फायर आणि ईलेक्ट्रीकल्स | आहे | आहे | आहे | २०/०२/२०१९ | १०७ ते ११५ |

एकूण १२ एजन्सीधारकांना प्रत्येकी १० वॉर्ड देऊन शिल्लक वार्ड शेवटची एजन्सीधारकांस देण्याचे आदेशित करण्यात आलेले आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल : विषयामध्ये काय-काय फायर ऑडिट केले आहे आणि सध्या परिस्थिती काय आहे.

अग्निशमन अधिकारी : प्रत्येक एजन्सीला दहा-दहा वार्ड दिलेले आहे त्यानुसार ते फायरब्रिड करतील. महाराष्ट्र संचालक यांनी ज्यांना रजिस्ट्रेशन दिलेले आहे,त्या एजन्सीचे अर्ज मागितले होते. शासनाच्या एजन्सी आहेत.

मा.सभापती : विषय क्र.२८० मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील तारांकित हॉटेल्स, रेस्टॉरंट, बिअरबार, परमीट रूम, लॉजींग, खाणावळ, कारखाने, मंगल कार्यालय, फंक्शन हॉल, सिनेमागृह, पेट्रोल व डिझेल पंप, एल.पी.जी. गॅस पंप, रॉकेल

एजन्सी, कमर्शियल बिल्डींग, रेसीडेन्सीयल बिल्डींग, स्वॉ मील, मोबाईल टॉवर्स, गॅस गोडाऊन, अल्कोहोल साठा, स्पिरीट साठा, फटाका शॉप, प्रदर्शन व इतर व्यवसाय धारकांसाठी अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येते. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम २००९ नुसार औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासह संपूर्ण महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रामध्ये लागू करण्यात आलेले असल्यामुळे, मा.संचालक, महाराष्ट्र अग्निशम सेवा संचालनालय, अग्निशमन सेवा अकादमी, मुंबई यांच्याकडून मान्यता प्राप्त एजन्सीकडून सर्व व्यवसायाचे फायर ऑडिट/सर्वेक्षण मान्यता प्राप्त एजन्सीकडून करावयाचे असल्याने व फायर ऑडीट करण्यासाठी वर्तमानपत्रात जाहीर प्रगटन देण्यात येऊन खालील एजन्सीधारकांनी अर्ज सादर केले असल्यामुळे, खालीलप्रमाणे एजन्सीधारकांकडून ११५ वॉर्डात प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.०१ ते १० च्या अटी व शर्तीच्या अधीन राहून फायर ऑडीट करून घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | अकादमीची मान्यता | अनुभव प्रमाणपत्र | लायसन्स नुतणीकरण | लायसन्स नुतणीकरण दिनांक | वॉर्ड १ ते ११५ |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | जय बजरंग फायर सर्व्हिसेस | आहे | आहे | आहे | २२/१०/२०१९ | ०१ ते १० |
| ०२. | अंडवांटेजसाई प्रोजेक्टस् प्रा.लि. | आहे | आहे | आहे | २९/०५/२०१९ | ११ ते २० |
| ०३. | टर्नकी प्रोजेक्टस सल्युशन | आहे | आहे | आहे | २०/०२/२०१९ | २१ ते ३० |
| ०४. | रूद्राणी फायर सर्व्हीसेस | आहे | आहे | आहे | २३/०४/२०१९ | ३१ ते ४० |
| ०५. | मॅक्ससेफ फायर सर्व्हीसेस | आहे | आहे | आहे | २०/०२/२०१९ | ४१ ते ५० |
| ०६. | ग्राफिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | आहे | आहे | आहे | ०९/०७/२०१९ | ५१ ते ६० |
| ०७. | फायर ब्रेक फायर सर्व्हीसेस | आहे | आहे | आहे | २९/०५/२०१९ | ६१ ते ७० |
| ०८. | मारूती एंटरप्रायझेस | आहे | आहे | आहे | १२/११/२०१९ | ७१ ते ७९ |
| ०९. | श्री. सर्व्हीसेस | आहे | आहे | आहे | २१/१२/२०१८ | ८० ते ८८ |
| १०. | के.व्ही. कार्पोरेशन | आहे | आहे | आहे | २२/१०/२०१९ | ८९ ते ९७ |
| ११. | साई फायरवेल इंजिनिअरींग | आहे | आहे | आहे | १८/१०/२०१९ | ९८ ते १०६ |
| १२. | केशर फायर आणि ईलेक्ट्रीकल्स | आहे | आहे | आहे | २०/०२/२०१९ | १०७ ते ११५ |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८१ :**

दि.०१/०२/२०१९ (का.प.क्र.२१), दि.०८/०२/२०१९ (का.प.क्र.२२), दि.१८/०२/२०१९ (का.प.क्र.२३), दि.२८/०२/२०१९ (का.प.क्र.२४), दि.०५/०३/२०१९ (का.प.क्र.२५) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणेस तसेच आज दिनांक ०८/०३/२०१९ (का.प.क्र.२६) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत स्विकृतीसह कायम करणे.

मा.सभापती : मागील इतिवृत्तांत व आज संपन्न होत असलेल्या सभेचे इतिवृत्तांत स्विकृतीसह कायम करणेस मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

दि.०१/०२/२०१९ (का.प.क्र.२१), दि.०८/०२/२०१९ (का.प.क्र.२२), दि.१८/०२/२०१९ (का.प.क्र.२३), दि.२८/०२/२०१९ (का.प.क्र.२४), दि.०५/०३/२०१९ (का.प.क्र.२५) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणेस तसेच आज दिनांक ०८/०३/२०१९ (का.प.क्र.२६) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत स्विकृतीसह कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. २८२ :**

विषय : झोन क्र.४ अंतर्गत वार्ड क्र.९,१०,११,२८,२९ व ३० मधील वसाहतीमध्ये पाणी पुरवठा देखभाल दुरूस्तीची कामे करणे बाबत या कामाचे ठेकेदार मे.शुभांगी कन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच १२.७० टक्के जास्त दराने म्हणजेच रक्कम रू.२७,६९,७५६/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : Tender ID- 2018-AMCA-377798-1

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) |
| २ | कामाचे स्वरुप | --- |

| | | |
|---|---|---|
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | पुर्वगणक पत्रक र.रू.२४,५६,६३६/- मान्य झाले आहे. (मा.आयुक्त महोदय यांची मान्यता) |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रू.२४,५७,६३६/- चे |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई निविदा मार्फत |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | १२/१२/२०१८ दुपारी ५.०० वा.पर्यंत |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | १४/१२/२०१८ दुपारी १०.०० स. वा.पर्यंत |
| ६ | निविदा किती वेळेस मागविल्या? | पहिली वेळेस |
| ७ | एकूण किती टेंडर्स/निविदा आली? | ३ (तिन) |
| ८ | निविदा प्राप्त दर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.८० टक्के जास्त दराने |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| **अ.क्र.** | **ठेकेदाराचे नाव व पत्ता** | **टेंडर रक्कम रुपये** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त** |
|---|---|---|---|
| ०१. | मे.शुभांगी कन्स्ट्रक्शन, (पुंडलिकनगर, औरंगाबाद) | २४,५७,६३६/- | १२.७० टक्के जास्त दराने (दर वाटाघाटीअंती) |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय?<br>ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | होय,<br>होय,<br>बाजारभाव वाढले असल्याने |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे.<br><br>अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | देखभाल दुरूस्ती (पाणी पुरवठा)<br><br>होय. |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | नाही |

तरी विषयांकित काम ठेकेदार मे.शुभांगी कन्स्ट्रक्शन यांचेकडून १२.७० टक्के जास्त दराने (मा.आयुक्त महोदय यांच्या दालनात झालेल्या दर वाटाघाटी मान्यतेनुसार) म्हणजेच टेंडर रक्कम रू.२७,६९,७५६/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो. तसेच मागील सर्व इतिवृत्तांसह आज रोजी संपन्न होत असलेल्या सभेचे इतिवृत्तांतासही स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.४ अंतर्गत वार्ड क्र.९,१०,११,२८,२९ व ३० मधील वसाहतीमध्ये पाणी पुरवठा देखभाल दुरूस्तीची कामे करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार मे.शुभांगी कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार ठेकेदार मे.शुभांगी कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.७० टक्के जास्त दराने म्हणजेच रक्कम रू.२७,६९,७५६/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद